# राज्य राजकारण:

## मुद्दे आणि पेचप्रसंग



Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta. Sonpeth Dist. Parbhani

संपादक

**डॉ. रत्नाकर बाबुराव लक्षटे**

**डॉ. माधव माणिकराव चोले**

# परिकल्पना

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

© सम्पादकाधीन

प्रथम संस्करण : 2023

ISBN : 978-93-95104-59-3

मूल्य : ₹ 695

शिवानंद तिवारी द्वारा *परिकल्पना, के-37, अजीत विहार, दिल्ली-110084* से प्रकाशित और शेष प्रकाश शुक्ल, दिल्ली से टाइप सेट होकर *काम्पैक्ट प्रिंटर्स, दिल्ली-110032 में मुद्रित*

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

# अनुक्रम

संपादकीय 4

1. केंद्र राज्य संबंधातील सरकारिया आयोगाच्या शिफारशी 13
*—शाम गंगाधर आवटे*

2. भारतीय संघराज्यातील वित्त आयोगाची भुमिका 16
*—डॉ. कल्याण गोलेकर*

3. संघराज्यापुढील नवीन आर्थिक आव्हाने 20
*—विश्वंभर धर्मा गायकवाड*

4. महाराष्ट्रातील आघाडीच्या राजकारणाची बदलती दिशा 25
*—प्रा. डॉ. कदम एच. पी.*

5. महाराष्ट्रातील पक्ष फुटीचे राजकारण 30
*—प्रा डॉ. आंधळे बी.व्ही.*

6. राज्यपाल तत्व आणी व्यवहार 36
*—मुकुंद येगांवकर*

7. औरंगाबाद शिक्षक मतदार संघ निवडणूक-2023 45
*—प्रा.डॉ.माधव चोले*

8. केंद्र आणि राज्यशासनातील सीएए आणि एनआरसी संघर्षाचा अभ्यास 51
*—रंदिल महेश गजेंद्र, डॉ. डोंगरे लक्ष्मण भीमराव*

9. भारतीय संघराज्य आणि स्वतंत्र राज्यांची मागणी 57
*—डॉ. संजय गायकवाड*

10. केंद्र-राज्य समन्वयातील राष्ट्रीय विकास परिषदेची भूमिका 61
*—प्रो. डॉ. विलास आघाव*

11. राज्यपालपदाचे राजकीयकरण 67
*—डॉ. आर. डी. शिंदे*

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

# 2. भारतीय संघराज्यातील वित्त आयोगाची भुमिका

**डॉ. कल्याण गोलेकर**
*सहाय्यक प्राध्यापक व राज्यशास्त्र विभागप्रमुख*
*कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय,*
*सोनपेठ जि. परभणी*

भारतीय संघराज्यातील वित्त आयोग हा भारत सरकार आणि राज्य सरकार यांच्या वित्तीय संसाधनांना नियमित, समन्वीत आणि एकिकृत करण्याचे महत्तवपूर्ण संवैधानिक संघटन आहे. वित्त आयोग ही एक संघिय संस्था आहे. ज्यास दिवाणी न्यायालयाचा दर्जा प्राप्त आहे. वित्त आयोग आपली कार्यपद्धती स्वतः निर्धारित करतो. संवैधानिक दृष्टया वित्त आयोग ही सल्लादायी संस्था आहे. त्यामुळे आयोगाच्या शिफारशी राष्ट्रपतीवर बंधनकारक नाहीत. वित्त आयोग मुख्यतः केंद्र सरकारच्या मदतीने घटकराज्यातील महसूली उत्पन्न आणि खर्चातील असंतूलन कमी करण्याच्या दृष्टीने वित्तीय सहाय्यतेच्या महत्त्वाच्या सिफारशी करतो. संघराज्य व्यवस्थेत वित्तीय व्यवस्था स्थिर करण्यासाठी आयोगाकडून वापरला जाणारा निष्पक्ष व तटस्थ दृष्टीकोन आयोगाच्या कार्यपद्धतीचे महत्त्व स्पष्ट करतो. भारतातील वित्तीय वितरणाचा प्रश्न सोडविण्याचे महत्त्वाचे काम आयोगाने केले आहे. ज्यामुळे केंद्र व राज्यात वित्तीय समन्वय साधता आला आहे. भारतीय संघराज्यात वित्त आयोग एका भक्कम आधाराची भुमिका पार पाडतो. जेथे एकिकडे अधिकाधिक वित्तीय मदतीची मागणी करणाऱ्या घटकराज्यांच्या राजकीय दबावापासून संघराज्याचे संरक्षण करतो तर दुसरीकडे गरजु राज्यांना आर्थिक मदत करण्यासाठी केंद्र सरकारला प्रवृत्त करतो. केंद्र सरकारला वित्त आयोगाच्या शिफारशींच्या विरुद्ध जाणे अशक्य असते.

**केंद्र-राज्य संबंधातील वित्तीय समस्या :** भारतीय संविधानातील केंद्र-राज्य वित्तीय संबंध निर्धारित करणाऱ्या तरतुदींची चर्चा प्रस्तुत शोध निबंधामध्ये केली आहे. केंद्र आणि राज्यांच्या उत्पादनांच्या साधनांचे विभाजन, वित्त आणि योजना आयोगाची भूमिका आणि कार्य यासंदर्भात भारतीय संघराज्यवादाचे अध्ययन केले असता घटकराज्यांमधून केंद्राच्या विरूध्द तक्रारी केल्या गेल्या. त्यामूळे समन्वयावर

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Tq.Sonpeth Dist.Parbhani

आधारित वित्तीय संबंध निर्माण होवू शकले नाहीत. मर्यादित आणि विषम उत्पादन साधनांचे वितरण, केंद्र शासनाच्या घटकराज्यांकडे बघण्याचा दृष्टीकोन, समतोल आर्थिक विकासाची समस्या आणि राज्यांची स्वायतता या आधारांवर राज्याकडून वित्तीय स्वायतेतची मागणी केली जावू लागली. वित्तीय संबंधात महत्त्वाची भूमीका असणाऱ्या वित्त आणि योजना आयोगाबद्दलही न्या. सरकारिया आयोगाकडे राज्यांनी तक्रारी केल्या. संतुलित वित्तीय संबंध निर्माण करण्याच्या हेतुने सरकारिया आयोगाने आपल्या शिफारशी केल्या, मात्र आयोगाच्या शिफारशीनंतर अर्थात 1988-89 नंतर सुध्दा केंद्र-राज्य वित्तीय संबंधात फारसे बदल घडून आले नाहीत. या बदलत्या परिस्थीत राज्यांच्या समस्यांचे स्वरूपही बदलत गेले. केंद्र-राज्य वित्तीय संबंधात प्रामुख्याने पुढील समस्या जाणवू लागल्या.

(1) राज्यांच्या गरजा आणि उपलब्ध साधन सामुग्रीचे प्रमाण यामध्ये विसंगती आहे. संविधानानुसार केंद्र आणि राज्यांसाठी निश्चित केलेल्या उत्पन्नाच्या मार्गात साम्यता नाही. केंद्राकडे राज्यापेक्षा अधिक उत्पन्नाची साधने आहेत, राज्यांच्या वाढत्या जबाबदाऱ्यांच्या प्रमाणात शाश्वत उत्पन्नाच्या साधनांचा अभाव हा केंद्र राज्य संबंधातील प्रमुख अडथळा आहे. त्यामूळे राज्यांची केंद्राकडे आर्थिक मदतीची मागणी वाढत जाते. मात्र केंद्र सरकार ही आर्थिक मदत करताना राज्याराज्यामध्ये भेदभाव करते. विरोधी पक्षांची सरकारे राज्यात असतील तर मदत देताना वेगळी मोजपट्टी वापरली जाते.

(2) राज्यांची स्वायतता लक्षात घेतली तर, ती केंद्र सरकारचे हात अधिक बळकट आणि राज्यांची स्थिती अधिक कमकुवत असल्याची दिसते. केंद्र सरकारला अमर्याद अधिकार आहेत, उत्पन्नाचे स्त्रोत अधिक आहेत. मात्र त्या तुलनेत राज्यांची स्थिती नाजूक आहे, शिवाय राज्यांवरील सामाजिक जबाबदाऱ्या वाढत आहेत. कायदा व सुरक्षेची जबाबदारी राज्यावर असतानाही केंद्रीय राखीवदले, सीमा सुरक्षा दल आणि पोलीसांच्या वापरावर बंधने अधिक पडतात. याच आधारावर राज्य स्वायततेची मागणी भारतीय संघराज्यात सातत्याने पुढे आली. जम्मू-काश्मिर, पश्चिम बंगाल, केरळ, तामिळनाडू ही लोकशाहीच्या नावाखाली स्वायततेची मागणी करणारी प्रमुखराज्ये होत.

(3) भारतातील विभिन्न घटकराज्यांमध्ये सामाजिक विधितेबरोबरच आर्थिक विकासाच्या बाबतीत असमतोल आणि विकासाची विस्तृत दरी आहे. भारतातील घटकराज्यांची विभागणी विकसीत आणि अविकसीत राज्ये अशी केली जाते. दारीद्रय रेषेचा विचार केल्यास ओरीसामध्ये एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात सर्वाधिक म्हणजे 46.4 टक्के, बिहारमध्ये 41.4 टक्के, छत्तीसगढ मध्ये 40.09 टक्के, झारखंडमध्ये 40.3 टक्के आणि मध्यप्रदेशात 38.3 टक्के गरीबीचे प्रमाण आहे. यातुलनेत पंजाब,

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Tq. Sonpeth Dist. Parbhani

हरीयाणा, महाराष्ट्र, तामिलनाडू, गोवा, आणि जम्मू-काश्मिर ही राज्ये [illegible]त. लोकसंख्या, औद्योगिक विकासारबरोबरच दरडोई उत्पन्नाच्या बाबतीतही विषमता आढळते. गोव्याचे दरडोई उत्पन्न सर्वाधिक असून सन 2011-12 मध्ये ते 192652 रूपये एवढे आहे. दिल्ली मध्ये 175812 रूपये, सिक्कीम मध्ये 121440 रूपये, हरियाणामध्ये 108859 रूपये, महाराष्ट्रात 101314 रूपये, उत्तरप्रदेशात 30052, मध्यप्रदेशात 38669, छत्तीसगढ मध्ये 46573 आणि राजस्थान मध्ये 47506 रूपये एवढे दरडोई उत्पन्न आहे. हा विकासातील असमतोल वित्तीय क्षेत्रात महत्त्वाची भूमीका असणाऱ्या वित्त आणि योजना आयोगाला दुर करता आला नाही. जी राज्ये गरीब आणि मागासलेली आहेत, त्यांना अधिक स्वायततेचे आकर्षण असते, तसेच केंद्र सरकारने आपल्याला अधिक अर्थ सहाय्य द्यावे ही त्यांची अपेक्षा असते.

(4) वित्तीय आयोगांचे महत्त्व संघराज्यात घटले आहे अशी तक्रार केली जाते. वित्तआयोग सामुग्रीच्या विवरणाबद्दल ज्या सुचना करतो त्यांची पुरेशी दखल घेतली जात नाही. केंद्र सरकार आणि योजना आयोग साधनसामुग्रीच्या वितरणासाठी स्वतःचेच मार्ग वापरते या स्वयंनिर्मित मार्गावर घटकराज्यांमधून टिका केली जाते.

(5) भारतीय संविधानात केंद्र सरकारने राज्यांना अनुदाने देण्याची तरतुद आहे. जी राज्ये अडचणीत आहेत, त्यांना अशा प्रकारच्या आर्थिक साहयाने समतोल विकास साधता येईल. मात्र या संदर्भात केंद्र सरकार राज्यांवर अतिरिक्त नियंत्रण राखते, त्यांना आपल्या अनुचित प्रभावाखाली ठेवते. असा गेल्या चार-पाच दशकाचा अनुभव आहे. राज्यांना परावलंबी बनविले जाते आणि राज्य सरकारे सुध्दा बेशिस्तीने वागतात, त्यामूळे केंद्र राज्य वित्तीय समस्या उद्‌भवतात.

उपरोक्त, केंद्र-राज्य वित्तीय संबंधातील अडथळे प्रामुख्याने 1989-90 नंतरच्या कालखंडात आढळून आले. केंद्र-राज्य समन्वयावर स्वस्थ संघराज्याचे भवितव्य अवलंबून असते. मात्र केंद्र सरकार व राज्य सरकारे यांच्या वित्तीय प्रवृत्ती परस्पर भिन्न बनत गेल्याने वित्तीय समन्वय घडून येवू शकत नाही.

**सारांश :** वरील प्रमाणे केंद्र-राज्य संबंधात वित्त आयोगाची भुमिका महत्त्वाची मानली जात असली तरी, वित्त आयोगाच्या कार्यप्रणालीत काही विसंगती देखिल आढळतात. वित्त आयोग राज्यांसाठी वित्तीय सहाय्यतेच्या तरतुदी करताना राज्यांकडून दिल्या जाणाऱ्या आकडेवारीवर अवलंबून असतो. खदाचित घटकराज्य अधिक मदत मिळविण्यासाठी असत्य आकडेवारी देवू शकतात. दुसरी गोष्ट अशी की, वित्त आयोग राज्यांचा दौरा करुन वित्तीय अनुदानाची सिफरस करतो. मात्र त्या अनुदानातून राज्यांमध्ये चालणाऱ्या कार्यक्रम किंवा योजनांची पाहणीमात्र केली जात नाही. आस्ट्रेलिया मध्ये मात्र अशी व्यवस्था आहे. तसेच प्रत्येक राज्यातील

महसूलाची कमी आणि वित्तीय गरज या विषयाची माहिती प्रसिद्ध करत नाही. त्यामुळेच संघराज्यात विवाद उत्पन्न होतात.

9 एप्रिल 2003 च्या वित्त आयोग सुवर्णजयंती समारंभात राज्यांच्या वित्तमंत्रयांनी आयोगाला मागास आणि चुकीच्या मान्यतेच्या आधारावर काम करणारे संवैधानिक संस्था असे संबोधले. वित्त आयोगाच्या कामकाजाची समिक्षा करुन त्याचे नवीन पद्धतीने गठन करावे अशी मागणी ही राज्यांनी केली. तसेच आयोगाच्या अनूदान देण्याच्या मापदंडावरही टीका केली गेली, अनुदानाची राशी ठरविण्याचा आधार 1971 ची लोकसंख्या हा आहे. मात्र आज लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. बाराव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष सी. संगराजन यांनीही काळानुरुप मापदंड बदल्याची आवश्यकता सांगितली. मात्र तत्कालीन वित्त मंत्री जसवंतसिंह यांनी योजना आयोगाप्रमाणे वित्त आयोग महत्त्वाचे संगठन मानले. त्यांनी राज्याच्या घटत्या महसूलाविषयी चिंता व्यक्त करुन वित्त आयोगाने यावर गंभिर्याने विचार करावा असे म्हटले. वित्तीय स्त्रोतांच्या विभागणीसाठी लादलेल्या अटीवरुन घटकराज्ये आयोगावर नाराजी व्यक्त करतात. उदारिकरण व वित्तीय शिस्त नसलेल्या राज्याचे अनुदान आयोग आपल्या मर्जीप्रमाणे काटतो. आयोगाची ही भूमीका राज्यांना जागतिक बँक आणि आंतराष्ट्रीय नाणे निधी सारखी वाटते. अशा पद्धतीने वित्त आयोगाची भारतीय संघराज्यातील भूमीका विवादित राहिली आहे.

## संदर्भ


1. Paylee M.V., 1977, constitutional Government of India, Asia Publication House, New Delhi
2. डॉ. फाडिया बि. एल., डॉ. फाडिया कुलदिप, (2010) भारतीय संघ व्यवस्था एवं केंद्र-राज्य संबंध, कैलास पुस्तक सदन भोपाळ.
3. पाटील बी. बी., (2002) भारतीय शासन आणि राजकारण, फडके प्रकाशन, कोल्हापूर.
4. हरीगोपाळ परांजपे, (1963) भारत की वित्तीय शासन व्यवस्था, केंद्रीय हिंन्दी निदेशालय, नई दिल्ली. डॉ. बी. एल. फाडिया, (2011) भारतीय प्रशासन, साहित्य भवन पब्लीकेशन आग्रा.
5. डॉ. देसाई स. श्री. मु डॉ. सौ. भालेराव निर्मल, (2014) भारतीय अर्थव्यवस्था निराली प्रकाशन, पुणे.
6. वित्त मंत्रालय भारत सरकार द्वारा पुरस्कृत, (2014) भारतीय अर्थव्यवस्था, प्रतियोगिता साहित्य सिरीज, आग्रा.
7. दत्त गौरव, महाजन अश्विनी, (2013) भारतीय अर्थव्यवस्था, एस. चांद अँड कंपनी, रामनगर दिल्ली.



Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Dist. Parbhani

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani